**जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे**

**कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी**

**दीक्षारंभ कार्यक्रम**

25-09-2023

**अहवाल**

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे विद्यार्थी विकास, सांस्कृतिक व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बी. ए., बी. कॉम व बी. एस्सी. प्रथम वर्ष प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांसाठी दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी

प्रमुख पाहुणे म्हणून जयभवानी व जगदंबा शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मा. श्री. प्रमोद गोरकर, अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, ग्रंथपाल डॉ.महारुद्र गव्हाणे व IQAC समन्वयक प्रा. डॉ. अयोध्या पवळ हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्त्रीशिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीताने पाहुण्यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री.प्रमोद गोरकर यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे प्रतिपादन केले की, जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय हे गेवराई तालुक्यातील पहिले माहविद्यालय आहे ज्यामधून अनेक चांगले विद्यार्थी घडले आहेत ज्यांनी आपला ठसा कला, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, क्रीडा तसेच इतर विविध क्षेत्रात उमटविला आहे. महाविद्यालयांस स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमासाठी तसेच क्रीडा विभागातर्गत विविध स्पर्धासाठी पारितोषिके मिळाली आहेत. महाविद्यालयात जे प्राध्यापक कार्यरत आहेत की, ते आपापल्या विषयात तज्ञ आहेत व विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबर, व्यव्हारिक ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर इतर उपक्रमामध्ये सहभाग घेऊन आपला व्यक्तिमत्व विकास साधावा असे आवाहन त्यांनी केले व विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.IQAC समन्वयक प्रा. डॉ.अयोध्या पवळ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयातील उपक्रमामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे व स्पर्धा परीक्षेच्या तासिकांना मोठया संख्येने उपस्थित राहून महाविद्यालयात उपलब्ध सर्व सुविधांचा लाभ घ्यावा जेणेकरून तुमचा व्यक्तिमत्व विकास चांगल्या प्रकारे होऊ शकेल असे प्रतिपादन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचा दैदीप्यमान इतिहास सांगितला. महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती दिली. ते म्हणाले की महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय, विविध साधनसामुग्रीयुक्त लाबोरेटरी, सुसज्ज जिमखाना,

सांस्कृतिक विभाग, एन. एस. एस. विभाग, संगणक लॅब, स्मार्ट क्लासरूम हे सर्व विदयार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत, या सर्व सुविधाचा लाभ विदयार्थ्यांनी घ्यावा व यश संपादन करावे. महाविद्यालयात विविध करिअर ओरिएंटेड कोर्सेस सुरु आहेत. त्यामध्ये विदयार्थ्यांनी प्रवेश घेऊन कौशल्यविकास साधावा असे आवाहन प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी केले व विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. या दीक्षारंभ कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रमेश रिंगणे यांनी केले. त्यामध्ये त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. विविध उपक्रम जसे की, एन. एस. एस. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष ,सांस्कृतिक विभाग, करिअर गायडन्स सेल, आणि इतर उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. हीरा पोटकुले यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. संतोषकुमार यशवंतकर यांनी केले.या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.







जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे
कला व विज्ञान महाविद्यालय,शिवाजीनगर,गढी
2023.09.25 11:34


महाविद्यालय,शिवाजीनगर,गढी


जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे
महाविद्यालय,शिवाजीनगर,गढी


ला व विज्ञान महाविद्यालय,शिवाजीनगर,गढी
॥ दीक्षारंभ ॥


कला व विज्ञान महाविद्यालय,शिवाजीनगर,गढी
॥ दीक्षारंभ ॥
कला व विज्ञान महाविद्यालय
2023.09.25 11:40


कला व विज्ञान महाविद्यालय,शिवाजीनगर,गढी
॥ दीक्षारंभ ॥


॥ दीक्षारंभ ॥
Student Induction Program


॥ दीक्षारंभ ॥
Student Induction Program









लोकाशा

27SEP2023

## विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये गुणात्मक व विकासात्मक बदल घडवणे आवश्यक- प्रमोद गोरकर



## विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये गुणात्मक व विकासात्मक बदल घडवणे आवश्यक- मा. प्रमोदजी गोरकर